**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## 'छत्रपती शिवाजी महाराजांची विचारधारा व व्यवस्थापन' विषयावर दोन वर्षाचा अभ्यासक्रम सुरु करण्यास विद्या परिषदेची मान्यता

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात 'छत्रपती शिवाजी महाराजांची विचारधारा व व्यवस्थापन' या विषयावर दोन वर्षाचा अभ्यासक्रम सुरु करण्यास नुकत्याच संपन्न झालेल्या विद्या परिषदेने मान्यता प्रदान केली. आजीवन अध्ययन व विस्तार विभागांतर्गत हा अभ्यासक्रम सुरु होणार आहे.

'छत्रपती शिवाजी महाराजांची विचारधारा व व्यवस्थापन' हा विषय सुरु करण्याबाबत शिवसेना उपशहर प्रमुख, अमरावती यांनी विद्यापीठाला निवेदन दिले होते, त्यांच्या निवेदनानुसार विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेने 'छत्रपती शिवाजी महाराजांची विचारधारा व व्यवस्थापन' या विषयाचा दोन वर्षाचा स्नातकोत्तर अभ्यासक्रम किंवा अल्पकालीन अभ्यासक्रम किंवा ऐच्छिक विषय पदवी किंवा पदव्युत्तर स्तरावर सुरु करण्यास तत्वतः मान्यता प्रदान करुन या संदर्भात समग्र विचारविनिमय करण्यासाठी अधिष्ठाता मंडळाकडे पाठविण्याचा निर्णय घेतला होता.

सदर अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी व सदर अभ्यासक्रमाची व्यवहार्यता तपासण्यासाठी मानवविज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. अविनाश मोहरील यांचे अध्यक्षतेखाली डॉ.यु.आर. जाणे, डॉ. संतोष बनसोड, डॉ.जी.एल. गुल्हाने व विकास विभागाचे उपकुलसचिव श्री मंगेश वरखेडे यांची समिती अधिष्ठाता मंडळाने गठीत केली होती. या समितीने सखोल विचारमंथन करुन सदर विषयाचा दोन वर्षाचा स्नातकोत्तर अभ्यासक्रम किंवा अल्पकालीन अभ्यासक्रम किंवा ऐच्छिक विषय पदवी किंवा पदव्युत्तर स्तरावर सुरु करण्यासाठी व्यवहार्यता आहे तसेच अभ्यासक्रमाचे मूल्य, रोजगाराचा भाग, करिअरच्या संधी अशा समितीच्या शिफारसी मान्य करण्यात येवून विद्या परिषदेकडे शिफारस करण्यात आली. अधिष्ठाता मंडळाने केलेल्या शिफारसीनुसार विद्या परिषदेने हा अभ्यासक्रम सुरु करण्याकरीता मान्यता प्रदान केली आहे.

आदर्श राजा, महापराक्रमी, सर्वधर्मसमभावाचे प्रतिक छत्रपती शिवाजी महाराजांची विचारधारा व व्यवस्थापन, कार्यशैली, राजकीय पैलू आदी विषयाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांच्या ज्ञानामध्ये भर पडणार असून त्या माध्यमातून समाजाचा व देशाचा विकास होण्यामध्ये वृद्धी होणार आहे.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै............................... अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. १४/१२/२०२०.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी